# मोखाडा नगर पंचायत, मोखाडा.

नगर पंचायत कार्यालय,मोखाडा.
ता.मोखाडा जि.पालघर,पिन कोड -४०१६०४
जा.क्र.

दुरध्वनी क्रमांक-०२५२९-२९५४२९
Email ID-npmokhada@gmail.com
दिनांक -


## जाहीर सूचना

**"महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५" अंतर्गत विविध लोकसेवा अधिसूचित करणेबाबत.**

सर्व नागरिकांना , सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, वाणिज्य संस्था तसेच सर्व राजकीय पक्ष , शासकीय व निमशासकीय कार्यालय तसेच केंद्रीय कार्यालय यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता तसेच नागरिकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातुन महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश – 2015, दि.28/04/2015 रोजी लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम 3 मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार नागरिकांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीने लोकसेवा अधिसूचित करण्यात येत आहेत. तसेच त्याची अंमलबजावणी करणारे पदनिर्देशित अधिकारी तसेच या सेवा वेळेवर न पुरविल्यास त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. तरी नगर विकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या सेवांची यादी मोखाडा नगर पंचायतीच्या नोटीस बोर्डवर तसेच https://mahaulb.in/PortalSite/#/app/home या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

नगरपंचायत मोखाडा
ता. मोखाडा, जि. पालघर

(अभिजित कदम)
**मुख्याधिकारी**
**मोखाडा नगरपंचायत मोखाडा**
जि.पालघर

**प्राधिकृत प्रकाशन**
**मुख्याधिकारी यांजकडून**
**मोखाडा नगर पंचायत**
**जाहीर प्रसिद्धीकरण**

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समायोजित लोकसेवा देण्याकरीता तसेच नागरिकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातुन महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश , २०१५ दि.२८/०४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. सदर अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने पूर्वी असलेल्या सेवा अधिनियमांतर्गत अधिसूचित करून त्याप्रमाणे संबधित सेवा पुरविणे आवश्यक आहे. त्यामध्ये नगरपंचायत या नागरी स्थानिक संस्थांचा समावेश आहे. नागरी संस्थांमार्फत देण्यात येणा-या विविध सेवा सुविधांपैकी नागरिक केंद्रबिंदू मानून , नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणा-या व ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त नागरिकांनी फायदा घेतला आहे व ज्या सेवा महत्वाच्या आहेत, अशा सेवा अध्यादेशाच्या कलम-३ अनुसार अधिसूचित करण्याबाबत महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक :एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि-१४, दि.२३/०६/२०१५ नुसार मा.शासनाने निर्णय घेतला आहे.

मा.शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार एकूण ७० सेवा स्थानिक प्राधिकरणानी अध्यादेशाचे कलम ३ अनुसार अधिसूचित करावयाच्या आहेत. परंतु त्यापैकी ०५ सेवा या फक्त महानगरपालिकेकरीता लागू असल्याने व विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे ही सेवा आमाजिआ/कक्ष-82/अधिसूचना/विवाह निबंधक/9568-69/16, दि.03/08/2016 रोजीचे पत्रान्वये वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, मोखाडा यांच्याकडे विवाह नोंदणीचे अधिकार देण्यात आलेले असल्याने मोखाडा नगरपंचायतीकडून नागरिकांना देण्यात येणा-या सेवांची संख्या ही ६६ इतकी होते. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश , २०१५ कलम ३ अन्वये सदर ६६ लोकसेवांची सूची, आवश्यक कागदपत्रे, फी, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांची यादी सोबत जोडली आहे.

**(अभिजित कदम)**
**मुख्याधिकारी**
**मोखाडा नगरपंचायत मोखाडा**
जि.पालघर